दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ बीड महाराष्ट्र | मंगळवार, 27 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 163 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

# पदवीधर, शिक्षकचा आज फैसला! पुणे विभाग विधान परिषद निवडणुकीच्या मतमोजणीकडे राजकीय पक्षांचे लक्ष

■ पुणे वृत्तसंस्था

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीचा निकाल आज, मंगळवारी स्पष्ट होणार आहे.
बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉलमध्ये मतमोजणी होणार असून, दोन्ही मतदारसंघांतील उमेदवारांचे राजकीय भवितव्य ठरणार आहे. वाढलेली मतदानाची टक्केवारी, उमेदवारांची संख्या आणि पसंतीक्रमानुसार मतमोजणीचे गुंतागुंतीचे गणित यामुळे निकालाकडे राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.

पदवीधर मतदारसंघात तीन लाख ८८ हजार १९ पैकी दोन लाख ४३ हजार ६११, तर शिक्षक मतदारसंघात ६१ हजार ९४० पैकी ५३ हजार १८५ मतदारांनी मतदान केले. अनुक्रमे ६२.७८ आणि ८५.८७ टक्के मतदान झाले.

मतपत्रिकांवरील पहिल्या पसंतीच्या मतांची मोजणी केल्यानंतर उमेदवाराला आवश्यक कोटा मिळाल्यास त्याला विजयी घोषित केले जाईल; अन्यथा सर्वांत कमी मते मिळालेल्या उमेदवाराला बाद करून नियमानुसार पुढील पसंतीची मते हस्तांतरित केली जातील. त्यामुळे पहिल्या पसंतीच्या मतांतील आघाडी अंतिम विजयाची हमी ठरणार नाही. वैध मतांची अंतिम संख्या निश्चित झाल्यानंतरच दोन्ही मतदारसंघांतील विजयाचा अधिकृत कोटा स्पष्ट होईल.

### पदवीधर : कोट्याचे गणित निर्णायक

पदवीधर मतदारसंघात भाजपच्या डॉ. स्मिता जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हर्षदा देशमुख-जाधव आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सुनील मोदी यांच्यासह ४७ उमेदवार रिंगणात आहेत. सन २०२०मध्ये दोन लाख २८ हजार २५९ मते वैध ठरली होती. त्या वेळी विजयाचा कोटा एक लाख १४ हजार १३० होता. यंदा अंदाजे दोन लाख २५ हजार ते दोन लाख ३० हजार वैध मते गृहीत धरल्यास कोटा एक लाख १२ हजार ते एक लाख १५ हजारांच्या दरम्यान राहू शकतो.

### शिक्षक : २५ हजारांच्या कोट्यावर लक्ष

शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे, काँग्रेसचे विद्यमान आमदार प्रा. जयंत आसगावकर, शिवसेना पक्षाचे पुरस्कृत उमेदवार सचिन सानप आणि माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्यासह ३० उमेदवारांमध्ये लढत आहे. सन २०२०मध्ये ५० हजार २२७ मते वैध ठरली होती आणि विजयाचा कोटा २५ हजार ११४ होता. यंदा मागील निवडणुकीतील वैध मतांचे प्रमाण कायम राहिल्यास सुमारे ५० हजार ४१५ मते वैध ठरू शकतात. त्यानुसार कोटा अंदाजे २५ हजार २०८ असण्याची शक्यता आहे.




# 'कविता रंगते कोजागिरीत'

परळीत रंगल्या काव्याच्या विविध छटा सलग ४ तास चाललेल्या कविसंमेलनाला रसिकांची उत्स्फूर्त दाद कोजागिरीच्या चांदण्यात काव्याची मेजवानी; परळीकर रसिक श्रोते काव्याने तृप्त! स्त्री-अस्तित्व, कष्टकरी बाप आणि दुष्काळाच्या वास्तवाने परळीतील कविसंमेलन गाजले! हास्य अन् संवेनांचा मिलाफ! परळीत रंगले निमंत्रित कवींचे बहारदार संमेलन! म.सा.प व स्व.सुवालालजी वाकेकर सामाजिक प्रतिष्ठान उपक्रम



■ परळी (नितीन ढाकणे)

- कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून येथील मराठवाडा साहित्य परिषद (म.सा.प.) आणि समाजभूषण स्व. सुवालालजी वाकेकर सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने निमंत्रितांच्या भव्य कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. 'कविता रंगते कोजागिरीत' या शीर्षकाखाली माणिक नगर येथील कल्याणकारी हनुमान मंदिराच्या प्रांगणात संपन्न झालेल्या या संमेलनात कवींनी एकापेक्षा एक सरस रचना सादर करत परळीकर रसिक श्रोत्यांची भरभरून वाहवा मिळवली. 'कविता रंगते कोजागिरी'त या शीर्षकाखाली संपन्न झालेल्या कविसंमेलनात अहमदपूरच्या स्त्री-अस्तित्व आणि आत्मभान
(रंजना गायकवाड, अहमदपूर):
- "अंधारली नाही रात, मी सुर्व्याचा दिस... बाईपण खास माझं बाईपण खास..." या कवितेतून त्यांनी स्त्रीच्या संघर्षमय जीवनाला आत्मभानाची जोड देत मानवी अस्तित्वाचा संवेदनशील शोध मांडला. त्यांची 'रुजवण' ही कविताही विशेष भावस्पर्शी ठरली.
परिवर्तनाची तळमळ
- (आत्माराम जाधव, गंगाखेड):
- "शक्य होईल तेवढे बदलायचे आहे मला, या जगाला साजरे बनवायचे आहे मला" या ओळींमधून त्यांनी जग अधिक सुंदर आणि सुसंवादी बनवण्याचा सकारात्मक व परिवर्तनशील दृष्टिकोन व्यक्त केला.
पाणी बचतीचा जिव्हाळ्याचा संदेश
(कवी अनंत मुंडे):
- "हात जोडूनी तुम्हा सांगतो, पक्के ठेवा तुम्ही ध्यानी हो... गांभीर्याने विचार करूनि, जपून वापरा पाणी हो..." दुष्काळाच्या गंभीर पार्श्वभूमीवर पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याचा अनमोल संदेश त्यांनी दिला. विहीर बोअर आटतील सारे पाणी येणार नाही नळाला, पाणी बचत करूनी जाऊ सामोरे दुष्काळाला....!
कष्टकरी बापाचे जिद्दी जीवन
(कवी सिद्धेश्वर इंगोले):
- "घामाच्या थेंबात चिंब जिंदगाणी, झिजतोया बाप चंदनावानी..."चंदनासारख्या झिजणाऱ्या बापाचे संघर्षमय जीवन, शेतावरील निस्सीम प्रेम आणि अनवाणी पायांनी राबण्याची जिद्द त्यांनी प्रभावी शब्दांत मांडली. आईचे कष्ट व कौटुंबिक वास्तव
(कवी अरुण पवार):
- "संसाराचा जाळ माय घामानं पुसिते, अशा काळोखाच्या राती माय चांदणं वेचिते..." या कवितेतून दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या भूमीसोबतच आईच्या कष्टांचे हृदयस्पर्शी चित्र उभे केले. तसेच, "माय परगात बाप गोठ्याचा धनी..." या कवितेतून मुलांच्या कृतघ्नतेमुळे वृद्धापकाळी आई-वडिलांची होणारी वाताहत मांडून उपस्थितांचे डोळे पाणावले.
समता आणि माणुसकीची गझल
(कवी आत्तम गेंदे):
- "तुझा नि माझा.. दोघांचाही धर्मच लवचिक व्हावा आता... दोघांनाही करता यावा प्रेमावरती दावा आता" जात-धर्माच्या मर्यादा ओलांडून प्रेमाला आणि माणुसकीला प्राधान्य देणारा समतावादी विचार त्यांनी मांडला. हास्य आणि संवेदनशीलता
(कवी अविनाश भारती):
- सलग चार तास चाललेल्या या संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन करत त्यांनी उपस्थितांना हास्यरसात चिंब भिजवले. "तुझ्या नाजूक हातात सखे चुडा ही नाजूक... माझी नजर भावुक.. त्याला सारेच ठाऊक..."या रचनेतून प्रेमातील हळुवार भावना मांडल्या, तर दुसरीकडे 'गर्भ नासला माणुसकीचा' या ओळीतून सामाजिक संवेदनहीनतेवर थेट प्रहार केला. टाळ्या , शिट्ट्या ,हास्याचे फवारे तर कधी करूण गंभीर अशा संमिश्र बाबीचा अनुभव या चार तासात परळीकर रसिक श्रोत्यांना अनुभवता आला. माणिक नगर येथील कल्याणकारी हनुमान मंदिराच्या प्रांगणात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष विजयशेठ वाकेकर हे होते.तर उद्घाटक म्हणून परळीच्या नगराध्यक्ष पद्मश्रीताई धर्माधिकारी या लाभल्या होत्या. यावेळी मा.बाजीरावभैय्या धर्माधिकारी,मा.सुरेशअण्णा टाक, प्रा.पवन मुंडे,मा.रमेश पवार,प्रा.माधव रोडे,मा.हाजी बाबू, प्रितेश तोतला, विजय दहिवाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.
- कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव प्रा.डॉ. राजकुमार यल्लावाड यांनी तर सूत्रसंचालन बालाजी कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बंडू आघाव ,सदस्य महेश होनमाने ,सुनिता कोमावार, डॉ.राजाभाऊ धायगुडे, सुनिलनाना फुलारी,महेशआप्पा शिंदे, रमेशआप्पा काळे, डी.एस. राठोड, शंकरराव गवते, विष्णू दहिफळे, सुनील देशमुख नरेंद्र राठोड आदींनी विशेष परिश्रम घेतले.





# आष्टीत भटक्या श्वानांच्या निर्बीजीकरणासाठी केंद्र सुरू!

## आमदार सुरेश धस यांच्या हस्ते उद्घाटन; रेबीज नियंत्रणासह नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल

■ आष्टी (प्रतिनिधी)

शहरातील भटक्या श्वानांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण मिळविण्यासह रेबीजसारख्या जीवघेण्या आजाराचा धोका कमी करण्यासाठी आष्टी नगरपंचायतीच्या वतीने श्वान निर्बीजीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे. आमदार सुरेश धस यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. 'युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी'च्या माध्यमातून 'कार्गो ॲनिमल रेबीज एलिमिनेशन'अंतर्गत ही मोहीम राबविण्यात येत आहे.

शहरातील भटक्या व मोकाट श्वानांची संख्या नियंत्रित ठेवणे, त्यांचे आरोग्य जपणे आणि श्वानदंशातून होणाऱ्या रेबीजचा धोका कमी करणे, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. यावेळी आमदार सुरेश धस यांनी केंद्राची पाहणी करून उपलब्ध सुविधा, निर्बीजीकरणाची प्रक्रिया आणि रेबीज प्रतिबंधासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती घेतली.

### शस्त्रक्रियेनंतर चार दिवस विशेष देखभाल

या मोहिमेसाठी संस्थेच्या वतीने स्वतंत्र श्वान पथक नियुक्त करण्यात आले आहे. हे पथक आष्टी नगरपंचायत हद्दीतील भटके व मोकाट श्वान पकडून त्यांना कार्गो हॉस्पिटलमध्ये नेते. तेथे शास्त्रोक्त पद्धतीने निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया केली जाते. त्यानंतर श्वानांची चार दिवस योग्य देखभाल केली जाते. शस्त्रक्रियेनंतर श्वान बरा झाल्यावर त्याला अँटी रेबीज लस देऊन पुन्हा त्याच्या मूळ ठिकाणी सोडण्यात येते. सुसज्ज ऑपरेशन थिएटर; १०० श्वानांच्या देखभालीची सुविधा

डॉ. हनुमंत शेळके आणि डॉ. स्वाती जोगदंड (शेळके) हे दोघेही पशुवैद्यकीय पदवीधर असून, त्यांच्या युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटीच्या माध्यमातून विविध शहरांमध्ये आणि ग्रामीण भागांत प्राणी कल्याण व श्वान निर्बीजीकरणाच्या मोहिमा राबविण्यात येतात. मुंबई, पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर महानगरपालिकांसह पंढरपूर, सांगोला, इंदापूर, चाळीसगाव, भोर, बारामती, राजगुरुनगर, शिरूर-घोडनदी नगर परिषद तसेच विविध ग्रामपंचायतींसोबत संस्था काम करीत आहे. संस्थेकडे सुसज्ज ऑपरेशन थिएटर, श्वान पथकासाठी निवासाची व्यवस्था आणि एकावेळी १०० श्वान दाखल ठेवण्याची क्षमता असल्याची माहिती देण्यात आली. या सुविधांमुळे श्वानांवर योग्य उपचार व देखभाल करणे शक्य होणार आहे. नागरिकांची सुरक्षितता आणि प्राण्यांचे आरोग्य यांचा समतोल भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण केल्यामुळे त्यांच्या संख्येतील अनियंत्रित वाढ रोखण्यास मदत होते. त्याचबरोबर रेबीज प्रतिबंधक लसीकरणामुळे नागरिकांना श्वानदंशातून होणाऱ्या रेबीजचा धोका कमी करण्यास हातभार लागतो. त्यामुळे आष्टी शहरातील नागरिकांची सुरक्षितता आणि प्राण्यांचे आरोग्य या दोन्ही दृष्टीने ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

यावेळी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी बाळदत्त मोरे, नगराध्यक्षा जिया बेग, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, डॉ. हनुमंत शेळके, डॉ. स्वाती जोगदंड (शेळके), नगरसेवक किशोर झरेकर, शरीफ शेख, सुरेश वारुंगुळे, अक्षय धोंडे, बाळासाहेब घोडके, ज्ञानदेव राऊत, इरशान खान, समीर शेख, अथहर बेग, गहिनीनाथ शिरसाठ, सूरज रोकडे, विजय साठे, गणेश काकडे, गणेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

> नगराध्यक्ष जिया बेग यांचे नागरिकांना आवाहन
> "भटक्या श्वानांच्या निर्बीजीकरण आणि रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहिमेला नागरिकांनी सहकार्य करावे. शहरातील भटक्या श्वानांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण मिळविणे, नागरिकांची सुरक्षितता जपणे आणि प्राण्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. श्वानांना इजा न करता, या मोहिमेसाठी येणाऱ्या पथकाला सहकार्य करावे. आष्टी शहर अधिक सुरक्षित आणि रेबीजमुक्त करण्यासाठी नगरपंचायतीच्या या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे."
> — **जिया बेग**
> नगराध्यक्ष, आष्टी नगरपंचायत




# धारूरच्या नायब तहसीलदारांना दहा हजार रुपये दंड : माहिती अधिकाराचा दणका : ॲड. अजित देशमुख

■ बीड (प्रतिनिधी)

किल्लेधारूर येथील स्वराज्य जनजागृती परिषदेचे तालुकाध्यक्ष संदिपान आप्पाराव थोरात यांनी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, धारूर यांच्याकडे माहिती अधिकारात माहिती मागितली होती. ही माहिती दिली नाही, हे सिद्ध झाल्याने राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी नायब तहसीलदार यांना दहा हजार रुपयाचा दंड ठोठावला असल्याची माहिती जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी दिली आहे.



माहिती अधिकार कायदा हा प्रभावशाली कायदा असून त्याला बोथट करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होत आहेत. मात्र प्रामाणिक कार्यकर्त्यांनी आज देखील या कायद्यांतर्गत माहिती घेत अनेक प्रकरणी तडीस लावल्याचे आपल्याला पहावयास मिळते. संदिपान थोरात यांनी महसुली विभागाशी संबंधित माहिती नायब तहसीलदार या माहिती अधिकाऱ्यांकडे मागितली होती. मात्र त्यांनी माहिती मुदतीत दिली नाही. त्यामुळे थोरात यांनी ॲड. अजित देशमुख यांच्या सल्ल्याने प्रथम अपील दाखल केले होते. त्यानंतर देखील माहिती मिळाली नाही, म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे धाव घेतली होती.

माहिती आयोगाने या प्रकरणाची सुनावनी घेतली आणि माहिती अधिकारी, नायब तहसीलदार यांनी माहिती दिली नाही, हे सिद्ध झाल्यामुळे माहिती अधिकाऱ्यांना दहा हजार रुपये दंड ठोठावला आहे. दंडाची रक्कम संबंधित माहिती अधिकाऱ्याकडून वसूल करून शासन जमा करण्याचे आदेश आयोगाने बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

# संपादकीय

## जलसंधारण दुष्काळमुक्तीचा उपाय

पाण्याचे महत्त्व खऱ्या अर्थाने जाणवते ते दुष्काळाच्या संकटात. पावसाने ओढ दिली, विहिरी आणि बोअरवेल आटल्या, धरणांमधील जलसाठा कमी झाला आणि पिण्याच्या पाण्यासाठीही संघर्ष करावा लागला की पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मोल लक्षात येते. दुष्काळाचा परिणाम केवळ पिण्याच्या पाण्याच्या टंचाईपुरता मर्यादित राहत नाही तर शेती, पशुधन, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेतकरी कुटुंबांच्या जीवनावरही त्याचे गंभीर परिणाम होतात. त्यामुळे दुष्काळ पडल्यावर पाण्याची व्यवस्था करण्यापेक्षा दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी आधीपासूनच नियोजन करणे आवश्यक आहे.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या महाराष्ट्राला दिलासा देण्यासाठी सरकारच्या उपाययोजना सुरू राहतील आणि भविष्यात आवश्यक त्या ठिकाणी अधिक प्रभावी उपाययोजना कराव्या लागतील. परंतु प्रत्येक उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची प्रतीक्षा करण्याची वेळ येऊ नये, शेतकऱ्यांना पिके वाचविण्यासाठी असहायपणे आकाशाकडे पाहावे लागू नये आणि गावांची अर्थव्यवस्था पाण्याच्या टंचाईमुळे वारंवार संकटात सापडू नये, यासाठी आजपासूनच दीर्घकालीन नियोजन करणे गरजेचे आहे. पाणी ही निसर्गाने दिलेली अमूल्य संपत्ती आहे. तिचे संवर्धन करणे ही केवळ सरकारची जबाबदारी नाही, तर समाजातील प्रत्येक घटकाचे कर्तव्य आहे. दुष्काळ पडल्यावर पाण्याचा शोध घेण्यापेक्षा पाऊस पडत असताना पाणी साठविण्याची तयारी करणे हीच दूरदृष्टी आहे. संकट आल्यानंतर उपाययोजना करणे आवश्यकच असते; परंतु संकटाची तीव्रता कमी करण्यासाठी आधीपासून काम करणे अधिक महत्त्वाचे आहे.

आज महाराष्ट्रातील अनेक भागांना दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, शेतीसाठी सिंचन, जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्न, भूजल पातळीतील घट आणि ग्रामीण भागातील आर्थिक अडचणी या परस्परांशी जोडलेल्या समस्या आहेत. पावसाची अनियमितता, काही ठिकाणी अल्पावधीत पडणारा अतिवृष्टीचा पाऊस, तर काही भागांत पावसाचे दीर्घकाळ खंडित राहणारे चक्र यामुळे परिस्थिती अधिक आव्हानात्मक बनत आहे. पाऊस पडूनही पाणी उपलब्ध राहत नसेल, तर त्यामागे केवळ पर्जन्यमानाचा प्रश्न नसतो; जलसंधारण, साठवण, पुनर्भरण आणि व्यवस्थापन याच्या नियोजनाचाही भाग असतो.

आपल्या देशात पाण्याचा प्रश्न केवळ उपलब्धतेचा नसून, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करण्याचा आहे. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते आणि उन्हाळ्यात अनेक गावांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. ही परिस्थिती बदलण्यासाठी 'धावत्या पाण्याला चालायला लावा, चालणाऱ्या पाण्याला थांबायला लावा आणि थांबणाऱ्या पाण्याला जमिनीत जिरवा,' हे जलव्यवस्थापनाचे मूलभूत तत्त्व प्रत्येक गावाने स्वीकारले पाहिजे. 'गावातील पाणी गावात, घरातील पाणी घरात आणि शेतीतील पाणी शेतीत' या विचारातून जलस्वयंपूर्णतेचा मार्ग तयार होतो.

पावसाचे पाणी अडविण्यासाठी नाले, ओढे आणि लहान नद्यांचे पुनरुज्जीवन, नाला खोलीकरण व रुंदीकरण, गाळ काढणे, लहान बंधारे उभारणे, पाणलोट क्षेत्राचा विकास, भूजल पुनर्भरण आणि वृक्षारोपण अशा विविध उपाययोजनांची आवश्यकता आहे. मात्र, ही कामे करताना स्थानिक भौगोलिक परिस्थिती, जमिनीचा प्रकार, पाण्याचा नैसर्गिक स्रोत, प्रवाह आणि भूगर्भातील जलसंधारणाची क्षमता यांचा शास्त्रीय अभ्यास करणे आवश्यक आहे. केवळ पाणी अडविणारी संरचना बांधणे म्हणजे जलसंधारण नव्हे; तर त्या संरचनेतून पाण्याचा दीर्घकालीन उपयोग कसा होईल, भूजल पातळी कशी वाढेल आणि शेतीला वर्षभर आधार कसा मिळेल, याचे नियोजन करणे महत्त्वाचे आहे.

याच विचारातून २५ वर्षांपूर्वी पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या माध्यमातून तामसवाडा पॅटर्न विकसित करण्यात आला. ग्रामीण भागातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी आणि शास्त्रीय उपाय शोधण्याच्या उद्देशाने वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील सुमारे १२ किलोमीटर लांबीच्या तामसवाडा नाल्याचे पुनरुज्जीवन केले. 'माथा ते पायथा' या तत्त्वावर आधारित या प्रकल्पात नाल्यातील गाळ काढणे, खोलीकरण, बंधाऱ्यांची दुरुस्ती व नवीन बंधाऱ्यांची उभारणी अशा उपाययोजनांसह संपूर्ण पाणलोट क्षेत्राचा एकात्मिक विकास करण्यात आला. ग्रामस्थ, शेतकरी, भूवैज्ञानिक, अभियंते आणि सरकारी विभागांच्या सहभागातून साकारलेल्या या प्रयोगामुळे पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत मुरविणे आणि भूजलसाठ्याचे पुनर्भरण करणे शक्य झाले. तामसवाडा पॅटर्नच्या यशस्वी अनुभवातून विदर्भातील ६०हून अधिक गावांमध्ये जलसंधारणाची कामे करण्यात आली. संस्थेच्या नोंदीनुसार, या उपक्रमामुळे सुमारे १० हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा आधार मिळाला असून, २४ लाख घनमीटर भूपृष्ठीय जलसाठा निर्माण झाला आहे. तसेच दर वर्षी सुमारे ६० लाख घनमीटर पाण्याच्या भूजल पुनर्भरणाची क्षमता विकसित झाली आहे. या जलसंधारण कार्याचा सुमारे एक लाख नागरिक आणि पाच हजार शेतकरी कुटुंबांना लाभ झाला असून, पाणीटंचाईवर मात करण्यासोबतच शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा हा एकात्मिक जलव्यवस्थापनाचा आदर्श ठरला आहे. यासोबतच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून रस्ते विकासासोबत जलसंधारणाला चालना देण्याच्या उद्देशाने बुलढाणा पॅटर्न राबविण्यात आला. अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ३५ तलाव बांधून दिले. रस्ते बांधणीसाठी लागणारी माती देताना त्या बदल्यात विनामूल्य जलसाठे निर्माण करण्याचे हे 'मॉडेल' आर्थिक बचतीसोबतच पर्यावरणीय समतोल राखण्याचे उत्तम उदाहरण आहे. बीजोत्पादनात झालेली विक्रमी वाढ, फलोत्पादनातून मिळणारे कोट्यवधींचे उत्पन्न आणि आसपासच्या १९ गावांच्या भूजल पातळीत झालेली सुधारणा, ही या प्रकल्पाच्या यशाची फलश्रुती आहे. जलसंधारणासाठी पूलवजा बंधाऱ्यांची निर्मिती आणि जुन्या कोल्हापुरी बंधाऱ्यांचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पुनर्निर्माण करणे, हेही महत्त्वाचे उपक्रम आहेत. योग्य तांत्रिक नियोजनातून एकाच प्रकल्पाद्वारे वाहतूक सुविधा आणि जलसाठवण या दोन्ही गरजा पूर्ण करता येतात. अशा उपाययोजनांमुळे जलसाठवण क्षमता वाढविणे, खर्चात बचत करणे आणि शेतीला पाण्याचा शाश्वत आधार देणे शक्य होते. रस्ते विकास आणि पर्यावरण संवर्धन यांची सांगड घालून दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी आमचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. दुष्काळमुक्त महाराष्ट्राची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी केवळ सरकार किंवा एखादी संस्था पुरेशी ठरणार नाही. पायाभूत सुविधा निर्माण करणे, तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, विविध विभागांमध्ये समन्वय साधणे आणि आवश्यक निधी उपलब्ध करून देणे ही भूमिका सरकार पार पाडतच आहे. त्याच वेळी ग्रामपंचायतींनी गावाच्या पाण्याचा हिशेब ठेवला पाहिजे. गावात किती पाऊस पडतो, किती पाणी वाहून जाते, किती पाणी जमिनीत मुरते, किती जलसाठा उपलब्ध आहे आणि पिण्यासाठी तसेच शेतीसाठी किती पाण्याची गरज आहे, याचा विचार करून ग्रामस्तरावर जलआराखडा तयार केला पाहिजे. शेतकऱ्यांनीही जलसंधारणाच्या कामांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. पाणी अडविण्याच्या संरचनांची देखभाल, नाल्यांमध्ये कचरा आणि अडथळे निर्माण होऊ न देणे, पाणलोट क्षेत्रातील मातीची धूप रोखणे, वृक्षारोपण करणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, या कामांत शेतकरी व ग्रामस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. उद्योगांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या निधीतून जलसंधारणाच्या कामांना हातभार लावावा. स्वयंसेवी संस्थांनी लोकसहभाग निर्माण करावा, तर तज्ज्ञांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन करावे. अशा सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच जलसंधारणाची चळवळ व्यापक होऊ शकते. पाण्याच्या प्रश्नाकडे केवळ एका हंगामापुरते पाहून चालणार नाही. आज आपण पाणी अडविण्यासाठी आणि जमिनीत जिरविण्यासाठी जे प्रयत्न करू, त्याचे परिणाम पुढील अनेक वर्षे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतील. जलसाठे निर्माण करणे ही सुरुवात आहे; त्यांचे संवर्धन करणे, नियमित देखभाल करणे आणि पाण्याचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे ही त्यापुढील महत्त्वाची पावले आहेत. जलसंधारणाच्या कामांमध्ये लोकांचा सहभाग केवळ श्रमदानापुरता मर्यादित नसावा. गावातील पाण्याबाबत निर्णय घेणे, कामांचे प्राधान्य निश्चित करणे, त्यांची गुणवत्ता तपासणे आणि निर्माण झालेल्या जलसंपत्तीचे संरक्षण करणे, या सर्व बाबींमध्ये लोकसहभाग आवश्यक आहे.





# वाल्मिकी ऋषी जयंतीनिमित्त अयोध्या नगरात सप्ताह उत्साहात संपन्न

## ह.भ.प. विनायक महाराज गुट्टे गुरुजी यांच्या संकल्पनेतून कीर्तनकारांची विनामूल्य सेवा सात दिवस अन्नदानाचा उपक्रम

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**

महर्षी वाल्मिकी ऋषी यांच्या जयंतीनिमित्त परळी वैजनाथ येथील अयोध्या नगरातील श्रीराम मंदिरात २० ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित सप्ताहाची सोमवारी (दि. २६) उत्साहात सांगता झाली. ह.भ.प. विनायक महाराज गुट्टे गुरुजी यांच्या संकल्पनेतून आयोजित या सप्ताहात विविध कीर्तनकारांनी विनामूल्य सेवा दिली. तसेच दररोज अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. धार्मिक भक्ती, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, प्रभू श्रीराम कथा, हरिपाठ आणि कीर्तन अशा विविध कार्यक्रमांनी हा सप्ताह भक्तिमय वातावरणात पार पडला.

सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ या वेळेत काकडा भजन, सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण आयोजित करण्यात आले होते. पारायणाचे नेतृत्व उषाबाई मन्नाळे यांनी केले. व्यासपीठ प्रमुख म्हणून भगवान महाराज फड (ढेबेवाडी) आणि वैजनाथ महाराज मुंडे (कन्हेरवाडी) यांनी जबाबदारी सांभाळली.

पारायणासाठी उपस्थित भाविक व मंडळींसाठी चहा आणि नाश्त्याची व्यवस्था सोमनाथ संभाजी केदार कुंटे, प्रभाकर गणपतराव कराड (इंजेगाव), गजानन नारायण मन्नाळे, घाडगे सुग्रीव नारायण, दराडे भरत उत्तमराव, कोरे सुरेश आप्पा आणि ढवळे विनायक संतराम यांच्यासह अयोध्या नगरातील अन्नदात्यांनी केली. सात दिवसांच्या पारायणानंतर ग्रंथदिंडी काढून पारायणाची सांगता करण्यात आली.

दुपारी २ ते ५ या वेळेत प्रिया नगर येथील ह.भ.प. इंद्रजीत महाराज मुंडे यांच्या अमृतवाणीतून दररोज प्रभू श्रीराम कथेचे श्रवण करण्याची संधी भाविकांना मिळाली. या कथेला सुधाकर घुले, हनुमंत नागरगोजे, फुलचंद मुंडे, त्यांचा लहान मुलगा आणि कृष्णा महाराज यांनी साथ दिली.

संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत हरिपाठाचा कार्यक्रम झाला. त्याचे नेतृत्व संभाजी गीते, महादेव फड आणि भगवान भांड यांनी केले. रात्री ७ ते ९ या वेळेत कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विश्वनाथ महाराज घोडके (माजी सैनिक, रायवाडी), संजय महाराज तांबडे (रामायण सेवक, तळेगाव), संपत महाराज गित्ते (गीता भक्त, नंदागौळ), श्यामसुंदर महाराज सोन्नर (ज्येष्ठ पत्रकार, प्रसिद्ध कवी, वडखेल), मंचक महाराज आघाव (रामभक्त, केदारी महाराज संस्थान, सारडगाव) आणि ॲड. श्रीराम महाराज गित्ते (सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक) यांनी कीर्तनसेवा दिली.

सप्ताहाच्या समारोपानिमित्त ह.भ.प. विनायक महाराज गुट्टे (रामायणाचार्य, संत जनाबाई संस्थान, गंगाखेड) यांचे विशेष कीर्तन आयोजित करण्यात आले होते. या वेळी गुलाल उधळून भक्तिमय वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

विशेष म्हणजे, सप्ताहात ज्या महाराजांनी कीर्तनसेवा दिली, त्यांनी आपल्या कीर्तनाच्या दिवशी अन्नदानाची पंगतही आयोजित केली. तसेच आपल्या कीर्तनासाठी गायक, वादक आणि भजनी मंडळांना निमंत्रित करून कार्यक्रमात सहभाग नोंदविला. या सप्ताहाचे संपूर्ण नियोजन समस्त अयोध्या नगरवासीयांच्या वतीने करण्यात आले. विनामूल्य कीर्तनसेवा आणि सातही दिवस अन्नदानाचा उपक्रम यामुळे हा सप्ताह परिसरात विशेष ठरला.

# ऊसतोडणी दर वाढीचा करार त्वरित करण्यात यावा :

## कामगार युनियन चा एल्गार दर वाढीसह ९ मागण्यासाठी शासनाला निवेदन

**बीड (प्रतिनिधी)**

यंदा पावसाने पूर्णपणे दडी दिल्याने निर्माण झालेली दुष्काळ सदृश्य परिस्थिती आणि हाती न आलेले खरीप पिक यामुळे बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारावर ऐन दिवाळीत घराऐवजी उसाच्या फडात सण साजरा करण्याची वेळ आली आहे. दसरा होताच पोटाची खळगी भरण्यासाठी मजुरांचे तांडे आपल्या जनावर व चिमुकल्यासह साखर कारखान्याच्या दिशेने लाखोच्या संख्येने जिल्हा बाहेर तसेच परराज्यात मार्गस्थ होऊ लागले आहेत.




महाराष्ट्र राज्य ऊसतोड वाहतूक, मुकादम, कामगार युनियनच्या वतीने दिनांक 4 सप्टेंबर 2026 रोजी ऊस तोडणी कामगार व ऊस वाहतूक दरामध्ये 80% दरवाढ करण्यात यावी अशी मागणी शासनाकडे केली होती. तसेच राज्यातील इतर ऊसतोड कामगार संघटनेने देखील ऊस तोडणी दर 80% ते 100% दरम्यान दरवाढ करण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करून शासनाकडे मागणी केलेली आहे. परंतु अद्याप पर्यंत शासनाने कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नसून. ऊस तोडणी दरवाढीचा त्रिपक्षीय करार यंदा तीन वर्षानंतर संपुष्टात आला असून नवीन ऊस तोडणी व वाहतूक दरवाढीचा करार त्वरित लवादाची त्रिपक्षीय बैठक घेऊन ऊसतोडनी व वाहतूक दर जाहीर करण्यात यावा अशी प्रमुख मागणी महाराष्ट्र राज्य ऊसतोड कामगार युनियनच्या वतीने राज्य उपाध्यक्ष डॉ. संजय तांदळे, शिव शाहू ऊसतोड कामगार संघटनेचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मोरे, डिजिटल मीडिया पत्रकार संघाचे अध्यक्ष आरती परळकर,बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये यांनी दिनांक 26 ऑक्टोबर 2026 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साखर संघाचे अध्यक्ष खासदार शरद पवार साहेब, ऊसतोड कामगारांच्या नेत्या तथा पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे तसेच सहकार, कामगार, सामाजिक न्याय मंत्री व साखर आयुक्त पुणे यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात करण्यात यावी, स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्या अध्यक्षांची निवड करण्यात यावी, ऊसतोड कामगारांच्या अपघातींना 10 लाख रुपयांची मदत देण्यात यावी, ऊस तोडणी कामगार व ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रक, ट्रॅक्टर, टायर बैलगाडी वाहतूक दरांना 80 % टक्क्यांची दरवाढ करण्यात यावी,हमाल,माथाडी, कामगारांप्रमाणे ऊस तोडणी मजुरांना कामगाराचा दर्जा देण्यात यावा, त्यांची नोंद शासकीय कामगार कार्यालयात करण्यात यावी, ऊसतोड कामगारांना कारखान्याच्या परिसरात, फडात किंवा साइटवर निवारा, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची,स्वच्छतागृह,लाईट, आरोग्याची सुविधा देण्यात यावी, आरोग्य सेवा अंतर्गत पॅथॉलॉजी लॅबसह मोबाईल हॉस्पिटलची व ॲम्बुलन्सची सोय प्रत्येक कारखान्यावर करण्यात यावी तसेच कारखान्याच्या परिसरात ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळेची सोय करण्यात यावी, हार्वेस्टर प्रमाणे ऊसतोड कामगारांना मजुरी देण्यात यावी, ऊस तोडणी कामगारांची दरवाढ महागाई निर्देशांकानुसार तथा बाजारभावाप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या महागाई भत्त्या प्रमाणे दरवर्षी वाहतूक व मजुरीत दरवाढ करण्यात यावी, स्थलांतरित ऊस तोडणी कामगार व स्थानिक ऊस तोडणी कामगार यांची नोंदणी साखर कारखान्यावर करून त्यांना ओळखपत्रे देण्यात यावेत.

आदी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर, शिवशाहू ऊसतोड कामगार संघटनेचे राज्यसंघटक पांडुरंग आंधळे,अखिल भारतीय किसान सभाचे जिल्हाध्यक्ष कॉ. प्राचार्य डी.जी. तांदळे, शेतकरी हक्क मोर्चाचे अध्यक्ष राजेंद्र आमटे, इंटक कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, ऊसतोड कामगार कृती समितीचे जिल्हाध्यक्ष मोहन जाधव, निमंत्रक बाजीराव ढाकणे,विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज संघटनेच्या जिल्हाध्यक्ष किष्किंधा पांचाळ, माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनूस, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक खेडे, शहराध्यक्ष सादेक सय्यद आदींची उपस्थिती होती.

# रुद्राक्ष देण्याच्या बहाण्याने सोन्याची अंगूठी लांबवणाऱ्या सराईत भामट्याला बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद



**परळी (प्रतिनिधी)**

परळी बसस्थानकात एका वयोवृद्ध प्रवाशाला चमत्कार दाखवण्याचे आमिष दाखवून आणि हातात रुद्राक्ष करून देण्याच्या बहाण्याने सोन्याची अंगूठी लांबवणाऱ्या सराईत भामट्याला बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) जेरबंद केले आहे. अफजल नवाब मदारी (वय २५, रा. लक्कडकोट, ता. येवला, जि. नाशिक) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून चोरीस गेलेली सुमारे १ लाख ७ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी जप्त करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २:०० वाजेच्या सुमारास गणपत लक्ष्मण आंधळे (वय वृद्ध, रा. हेळंब, ता. परळी, जि. बीड) हे परळी बसस्थानकावर आले असता, आरोपीने त्यांच्याशी संवाद साधला. "मी चमत्कार दाखवतो" असे सांगत त्याने वृद्धाच्या हातात दगडाचा खडा दिला आणि त्याचा रुद्राक्ष करून देतो असा बहाणा केला. या दरम्यान नजरचुकवून आरोपीने वृद्धाच्या हातातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी काढून घेतली व पळ काढला. या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २३२/२०२६ कलम ३१८(१) भारतीय न्याय संहिता (BNS) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून परळी शहर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी समांतर तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलीस पथकाने घटनास्थळाचे सीसीटीव्ही (CCTV) फुटेज तपासले तसेच फिर्यादींकडून आरोपीच्या पेहरावाबद्दल सविस्तर माहिती घेतली. गोपनीय बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीवरून सदर गुन्हा येवला (नाशिक) येथील सराईत गुन्हेगार अफजल मदारी याने केल्याचे निष्पन्न झाले. तपास पथकाने तात्काळ आरोपीचा फोटो, मोबाईल क्रमांक व इतर माहिती हस्तगत करून नाशिक जिल्ह्यातील येवला येथे जाऊन त्याला ताब्यात घेतले. सखोल चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्या ताब्यातून चोरी गेलेली १० ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी (किंमत अंदाजे रु. १,०७,०००/-) हस्तगत करण्यात आली आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोउनि सुशांत सुतळे, पोह/मारोती कांबळे, पोह/सचिन सानप, पोह/गोविंद भताने, पोअ/सचिन आंधळे, चापोह/अतुल हराळे व पोअ/विकी सुरवसे यांनी मोलाची कामगिरी बजावली.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# महागाव बसस्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारात खासगी क्रूझर चालकाची एसटी चालकाला लोखंडी रॉडने मारहाण

## साईड देण्यावरून वाद; २० शाळकरी विद्यार्थिनींची तासभर गैरसोय, पोलीस अधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या मध्यस्थीने विद्यार्थिनी सुखरूप घरी










**महागाव :** येथील नवीन बसस्थानक चौकात एसटी बसला साईड देण्याच्या कारणावरून खासगी क्रूझर चालकाने एसटी चालकाला लोखंडी रॉडने मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत एसटी चालक ज्ञानेश्वर वानखेडे किरकोळ जखमी झाले असून, मारहाणीनंतर खासगी क्रूझर चालक घटनास्थळावरून पसार झाला. बसस्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली. दरम्यान, पोलीस अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळीच हस्तक्षेप करून समजूत घातल्याने शाळकरी विद्यार्थिनींची गैरसोय दूर झाली आणि त्यांना सुखरूप घरी पोहोचविण्यात आले.

### ■ साईड देण्यावरून वादाचे रूपांतर मारहाणीत

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच ४० वाय ५४०६ क्रमांकाची एसटी बस महागाव बसस्थानकातून विद्यार्थिनींना घेऊन सेनाद येथे जाण्यासाठी निघाली होती. यावेळी नवीन बसस्थानक चौकात एमएच २८ एएन ३०२९ क्रमांकाची खासगी क्रूझर उभी होती. एसटी बसला पुढे जाण्यासाठी जागा मिळावी म्हणून चालक ज्ञानेश्वर वानखेडे यांनी क्रूझर बाजूला घेण्यास सांगितले. मात्र, यावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला. या वादातून खासगी क्रूझर चालकाने लोखंडी रॉडने वानखेडे यांना मारहाण केली आणि त्यानंतर घटनास्थळावरून पळ काढला.

### ■ विद्यार्थिनींची तासभर रखडपट्टी

सायंकाळी शाळा सुटण्याच्या वेळी हा प्रकार घडल्याने सेनाद येथे जाणाऱ्या बसमधील सुमारे २० शाळकरी विद्यार्थिनींना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे विद्यार्थिनींना जवळपास एक तास बसस्थानकावर प्रतीक्षा करावी लागली. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा आणि त्यांना वेळेत घरी पोहोचविण्याचा प्रश्न निर्माण झाला होता.

### ■ ठाणेदार सेवानंद वानखेडे, रायटर वसीम शेख व सामाजिक कार्यकर्त्यांच्या मध्यस्थीने विद्यार्थिनी सुखरूप घरी

घटनेची माहिती मिळाल्यानंतर ठाणेदार सेवानंद वानखेडे, पोलीस स्टेशनचे रायटर वसीम शेख आणि सामाजिक कार्यकर्ते धम्मानंद कावळे, राणू कुरेशी, राजू अडकीने, अजीम शेख, वासिक कुरेशी व राजू वाकोडे यांनी पुढाकार घेतला. सर्वांनी समजूत घालून परिस्थिती सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या मध्यस्थीमुळे विद्यार्थिनींची होत असलेली गैरसोय थांबविण्यास मदत झाली.

त्यानंतर एसटी चालक ज्ञानेश्वर वानखेडे यांनी पुन्हा बस चालवून विद्यार्थिनींना सेनाद येथे सुखरूप पोहोचविले. ऐन शाळा सुटण्याच्या वेळी निर्माण झालेल्या या परिस्थितीत पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे विद्यार्थिनींना मोठा दिलासा मिळाला. त्यांच्या समन्वयातून विद्यार्थिनींना सुरक्षितपणे घरी पोहोचविण्याचा प्रश्न मार्गी लागला.

### ■ बसस्थानक परिसरातील वाहतूक शिस्तीचा प्रश्न ऐरणीवर

बसस्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ खासगी प्रवासी वाहने उभी करून प्रवासी भरणे आणि त्यामुळे एसटी वाहतुकीला अडथळा निर्माण होणे, हा प्रकार प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर ठरू शकतो. साईड देण्यासारख्या कारणावरून थेट मारहाण करण्याची घटना संतापजनक असून, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने बसस्थानक परिसरातील वाहतूक व्यवस्थेवर लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

वृत्त लिहेपर्यंत या प्रकरणी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाली. पोलिसांकडून पुढील कारवाई केली जात असल्याचे समजते.

सार्वजनिक ठिकाणी कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार का, तसेच बसस्थानक परिसरातील वाहतूक शिस्त कधी सुधारणार, असा प्रश्न या घटनेनंतर उपस्थित होत आहे.

# डॉ. सायली जगताप आणि गटविकास अधिकारी प्रयाग ढमाळ यांचा साखरपुडा उत्साहात संपन्न

## राजकीय, प्रशासकीय अधिकारी, सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती; नवदाम्पत्यावर शुभेच्छांचा वर्षाव

**प्रतिनिधी - सोपान पगारे**

आष्टी पंचायत समितीचे माजी सभापती बद्रीनाथ जगताप यांची कन्या डॉ. सायली जगताप आणि सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील असवली येथील सुनील ढमाळ यांचे चिरंजीव आष्टी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रयाग ढमाळ यांचा साखरपुडा सोहळा रविवारी आष्टी येथील आराज मल्टीपर्पज हॉलमध्ये उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या आनंदसोहळ्यामुळे जगताप आणि ढमाळ कुटुंबीयांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या सोहळ्याला राजकीय, प्रशासकीय अधिकारी, सामाजिक, शैक्षणिक तसेच पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर, विविध पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, नातेवाईक आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी डॉ. सायली जगताप आणि प्रयाग ढमाळ यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वैवाहिक आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

आप्तस्वकीय आणि मित्रपरिवाराच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यात दोन्ही कुटुंबीयांच्या आनंदाला विशेष उधाण आले होते. विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त झाली. स्नेहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याने उपस्थितांच्या आनंदात भर घातली.

डॉ. सायली जगताप आणि गटविकास अधिकारी प्रयाग ढमाळ यांच्या नव्या जीवनप्रवासाची सुरुवात होत असताना त्यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या साखरपुडा सोहळ्याची आष्टी तालुक्यात चर्चा असून, दोन्ही कुटुंबीयांवर नातेवाईक, मित्रपरिवार आणि मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.



# गट विकास अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासन उत्तम माने यांचे उपोषण स्थगित

## सिरसाळ्यातील गट क्रमांक १ मधील ओपन स्पेस अतिक्रमण प्रकरण : ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार ३० दिवसांची मुदत

**परळी :** परळी तालुक्यातील सिरसाळ्यातील गट क्रमांक १ मधील प्लॉटिंगच्या ऑपन स्पेस अतिक्रमण प्रकरणी जेष्ठ नेते उत्तम माने यांनी परळी पंचायत समिती कार्यालया समोर दिनांक २६ ऑक्टोंबर रोजी अमरण उपोषण केले. सदरील अंदोलन सिरसाळा ग्रामपंचायतीच्या मुदत वेळेच्या मागणीनुसार गट विकास अधिकारी यांनी अंदोलक माने यांना सदरील प्रश्नी कार्यवाही च्या लेखी अश्वासना नंतर स्थागित करण्यात आले आहे. गट विकास

अधिकाऱ्यांनी उपोषणकर्त्यांना दिलेल्या लेखी पत्रात नमूद केले आहे की, सिरसाळा ग्रामपंचायतीला नियमाप्रमाणे आवश्यक ती कडक कारवाई करण्याचे आदेश यापूर्वीच देण्यात आले आहेत. सरपंच व ग्रामसेवकांच्या विनंतीवरून सकारात्मक कारवाईसाठी ३० दिवसांचा वेळ देण्यात येत असल्याने, उपोषणकर्त्यांनी आपले आमरण उपोषण तात्काळ स्थगित करून प्रशासनाला सहकार्य करावे.




या लेखी आश्वासनानंतर आणि प्रशासनाच्या मध्यस्थीनंतर उपोषणकर्ते माने उत्तम यशवंतराव यांनी प्रशासनावर विश्वास ठेवून आपले उपोषण तूर्तास स्थगित केले आहे. मात्र, दिलेल्या मुदतीत ग्रामपंचायतीने अतिक्रमण न हटवल्यास पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देखील यावेळी उत्तम माने यांनी दिला आहे. या विषयी सविस्तर वृत्त असे कि,सिरसाळ्यातील

गट क्रमांक १ मध्ये १४८ प्लॉट असून त्यामध्ये दोन ओपन स्पेस असल्याचे माने यांनी निवेदनात नमूद केले आहे. या ओपन स्पेसमध्ये संबंधित व्यक्तींच्या नावाने ८/९ वर्षा पुर्वी तत्कालीन ग्रामपंचायत कारभा-या कडून नमुना क्रमांक ८ पीटीआर बेकायदेशीर तयार करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला असून, अशा नोंदी तातडीने रद्द कराव्यात, ओपन स्पेसवरील अतिक्रमणे हटवावीत तसेच मूळ रेकॉर्डनुसार रस्त्यांची रुंदी कायम ठेवावी, अशी मागणी केली आहे. तसेच या प्रकरणाची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या ग्रामविकास अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या प्रकरणी वारंवार निवेदने देऊनही अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप माने यांनी केला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पत्रव्यवहार होऊनही अतिक्रमणे हटविण्यात आली नसल्याने अखेर आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारल्याचे त्यांनी सांगितले. अखेर ग्रामपंचायत/पंचायत समिती यांनी सदरील प्रश्नी सकारात्मकता दर्शवता ३० दिवसांच्या मुदतीने हे अंदोलनाचा तोडगा काढला आहे. अंदोलन दरम्यान गट विकास अधिकारी भोसले, सरपंच शेख नशीब भाई,ग्रामविकास अधिकारी भोळे मॅडम, परळी माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख, मिलिंद घाडगे,वृक्षराज निर्मळ,मिलिंद चोपडे

नगरसेवक बागवाले, सुरेश माने,बंडू निर्मळ,वैजनाथ देशमुख,मुन्ना काळे,कपिल चोपडे,ग्रामपंचायत सदस्य इम्रान भाई काझी,संतोष किरवले,महम्मद शरीफ,तौफिक भाई कुरेशी

महादेव गंगणे, श्रीनिवास एडवोकेट दहिफळे, रानबा गायकवाड,राऊत, बाबा शेख, इमरोज पठाण ,बदर भाई, धीरज माने, विलास शिंगणे,कृष्णा बदले, बबनराव कसबे, ज्ञानेश्वर मुंडे , सरपंच सात भाई, केशव ढेकळे, करण कुराडे, शाहिद शेख ,अहमद गौस

वैभव वैराळ,तुकाराम माने, आदी सह अनेक जण उपस्थित होते.

दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
बीड, मंगळवार, 27 ऑक्टोबर 2026


# आष्टी पोलिसांची डिझेल चोरट्यांविरुद्ध मोठी कारवाई!

## ४०० ते ४५० लिटर डिझेलसह आरोपी जेरबंद; बीएमडब्ल्यूसह चारचाकी वाहनांचा चोरीच्या गुन्ह्यांत वापर



**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी तालुक्यात डिझेल चोरी करणाऱ्या टोळीविरुद्ध आष्टी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी पाठलाग करून एका संशयिताला ताब्यात घेतले. त्याच्याकडील विनानंबरच्या स्विफ्ट कारची झडती घेतली असता, सुमारे ४०० ते ४५० लिटर डिझेल, डिझेल काढण्यासाठी वापरण्यात येणारी मोटार आणि पाइप आढळून आले. या प्रकरणाच्या पुढील तपासात डिझेल चोरीच्या गुन्ह्यांसाठी वापरण्यात आलेली आणखी तीन चारचाकी वाहने ताब्यात घेण्यात आली असून, त्यामध्ये बीएमडब्ल्यू कारचाही समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

■ **चिंचपूर परिसरात पाठलाग करून संशयिताला पकडले**

सकाळी सात वाजण्याच्या सुमारास जामखेड–आष्टी मार्गावरील चिंचपूर गावाच्या परिसरात काळ्या काचा असलेल्या विनानंबरच्या स्विफ्ट कारचा पोलिसांना संशय आला. पोलीस अंमलदार नागेश लोमटे यांनी पाठलाग करून कार थांबवली. यावेळी कारमधील गोविंद पोपट शिरसाट (रा. मातकुळी, ता. आष्टी, जि. बीड) याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्याला जागीच पकडले.

■ **११ ड्रममध्ये डिझेल; चोरीसाठी लागणारे साहित्यही जप्त**

पोलिसांनी कारची झडती घेतली असता, त्यामध्ये वेगवेगळ्या ११ ड्रममध्ये अंदाजे ४०० ते ४५० लिटर डिझेल आढळून आले. तसेच डिझेल काढण्यासाठी वापरण्यात येणारी मोटार आणि पाइपही मिळून आले. पोलिसांनी संबंधित साहित्य ताब्यात घेऊन संशयिताकडे अधिक चौकशी सुरू केली.

■ **बीएमडब्ल्यूसह तीन अन्य वाहनांचाही तपासात समावेश**

पोलिसांच्या माहितीनुसार, डिझेल चोरीच्या विविध गुन्ह्यांमध्ये वापरण्यात आलेली आणखी तीन चारचाकी वाहने ताब्यात घेण्यात आली आहेत. यामध्ये बीएमडब्ल्यू कारचाही समावेश आहे. या वाहनांचा वापर करून विविध ठिकाणांहून डिझेल चोरी करण्यात आल्याचा संशय असून, या प्रकरणातील संपूर्ण टोळीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

या टोळीत मातकुळी गावातील २० ते ३० वयोगटातील काही तरुणांचा सहभाग असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच अटक करण्यात आलेल्या आरोपीविरुद्ध अहिल्यानगरसह इतर जिल्ह्यांतील विविध ठिकाणी डिझेल चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. या प्रकरणात सध्या दोन आरोपींना अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले असून, या टोळीचे इतर सदस्य, चोरीच्या घटनांची व्याप्ती आणि वाहनांच्या वापरासंबंधी अधिक तपास सुरू आहे.

■ **भारत पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाची कामगिरी**

ही कारवाई वरिष्ठांच्या सूचनेनुसार आष्टी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी भारत पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नाना सूर्यवंशी, पोलीस अंमलदार नागेश लोमटे, अमोल नवले, भारत गुजर, नवनाथ पाखरे, नितीन काकडे, विलास गुंडाळे, अक्षय लोंढे, सचिन शिरसागर आणि दादा येळे यांच्या पथकाने केली.

या कारवाईमुळे डिझेल चोरीच्या घटनांमागील साखळी उघडकीस येण्याची शक्यता असून, अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आष्टी पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे महत्त्व अधोरेखित होत आहे.

### गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांची धडक कारवाई

शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत डिझेल चोरी करणारी टोळी सक्रिय असल्याची गोपनीय माहिती पोलीस अंमलदार नागेश लोमटे यांना मिळाली. त्यांनी तत्काळ ही माहिती आष्टी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी भारत पांढरे यांना दिली. त्यानंतर पांढरे यांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक नाना सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथक कारवाईसाठी रवाना झाले.



# सांगवी पाटण येथे ५५ व्या अखंड हरिनाम सप्ताहात स्वप्निल महाराज पवार यांचे कीर्तन संपन्न

## ‘पाणी आडवा, पाणी जिरवा; स्त्रीभ्रूणहत्या करू नका’ — स्वप्निल महाराज पवार यांचे आवाहन; वृक्षसंवर्धन आणि व्यसनमुक्तीचा संदेश

**कडा - प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे श्री शंकर पुरी मंगळपुरी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित ५५ व्या अखंड हरिनाम सप्ताहात पाचव्या दिवशी ह.भ.प. स्वप्निल महाराज पवार (चिचोंडी पाटीलकर) यांचे कीर्तन उत्साहात संपन्न झाले. गुरुवर्य सुदर्शन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली हा सप्ताह सुरू असून, कीर्तनसेवेला पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी उपस्थिती लावली.

शनिवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी रात्री ७ ते ९ या वेळेत स्वप्निल महाराज पवार यांनी आपल्या कीर्तनातून भक्ती, पर्यावरण संवर्धन, जलव्यवस्थापन, व्यसनमुक्ती आणि स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंधाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला.

■ **‘हरिनाम स्मरणातून जीवनाला दिशा’**

कीर्तनातून मार्गदर्शन करताना स्वप्निल महाराज पवार म्हणाले की, ज्याच्या मुखात देवाचे नामस्मरण आहे, तो जीवनात सुखी असतो. हरिनामाच्या स्मरणामुळे माणसाला मानसिक समाधान आणि जीवन जगण्याची नवी प्रेरणा मिळते. चांगले आचरण ठेवा, भक्तिमार्गाचा स्वीकार करा आणि धर्माच्या प्रसारासाठी योगदान द्या, असे आवाहन त्यांनी केले.

■ **वृक्षसंवर्धन आणि जलव्यवस्थापनाचा संदेश**

पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करताना महाराजांनी ‘झाडे लावा, झाडे जगवा; झाडे तोडू नका’ असा संदेश दिला. पाऊस, निसर्ग आणि पशुपक्ष्यांचे जीवन यांचा परस्परांशी असलेला संबंध लक्षात घेऊन प्रत्येकाने पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारावी, असे त्यांनी सांगितले.

सांगवी पाटण येथील ग्रामस्थांनी कीर्तनकारांचा शाल व हार देऊन सत्कार करण्याऐवजी आंब्याच्या रोपाचे रोपण करून पर्यावरणपूरक सत्कार करावा, असे आवाहनही त्यांनी केले. तसेच पावसाचे पाणी अडवून जमिनीत जिरविणे आवश्यक असून, ‘पाणी आडवा, पाणी जिरवा’ हा संदेश प्रत्येकाने कृतीत आणावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

■ **व्यसनमुक्ती आणि स्त्रीभ्रूणहत्या रोखण्याचे आवाहन**

समाजातील अनिष्ट प्रथा आणि व्यसनाधीनतेवर भाष्य करताना महाराजांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी जीवन जगण्याचे आवाहन केले. स्त्रीभ्रूणहत्या ही समाजासाठी गंभीर समस्या असून, मुलगा-मुलगी असा भेद न करता मुलींचाही सन्मान केला पाहिजे, असा सामाजिक संदेश त्यांनी आपल्या कीर्तनातून दिला.

भक्तिरसाबरोबरच सामाजिक जाणीव जागृत करणाऱ्या या कीर्तनसेवेला उपस्थित भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी पंचक्रोशीतील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबाजोगाईचा भूमिपुत्र डॉ. आदित्य पतकराव जागतिक व्यासपीठावर मांडणार भारताची आरोग्यदृष्टी!

## बँकॉक येथील संयुक्त राष्ट्रांच्या परिषद केंद्रात आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निमंत्रण; ‘निरोगी भारत, निरोगी विश्व’ या विषयावर मांडणार मौखिक आरोग्याचे महत्त्व

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

अंबाजोगाईच्या मातीतून घडलेल्या आणि पुण्यात आपल्या वैद्यकीय कार्याचा ठसा उमटविणाऱ्या सुप्रसिद्ध दंतशल्यचिकित्सक डॉ. आदित्य पतकराव यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण भरारी घेतली आहे. पुणे येथील ‘डॉ. आदित्य्स ॲडव्हान्स डेंटल हॉस्पिटल’चे संस्थापक असलेल्या डॉ. आदित्य पतकराव यांना थायलंडमधील बँकॉक येथे आयोजित करण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत वक्ता म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या परिषद केंद्रात (UNCC) १५ जानेवारी २०२७ रोजी होणाऱ्या या परिषदेत ते ‘ओरल हेल्थ : ए हेल्दी भारत, ए हेल्दी वर्ल्ड’ अर्थात ‘मौखिक आरोग्य : निरोगी भारत, निरोगी विश्व’ या विषयावर भारताची आरोग्यदृष्टी जागतिक व्यासपीठावर मांडणार आहेत. त्यांच्या या निवडीमुळे अंबाजोगाईसह संपूर्ण परिसरातील वैद्यकीय क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मानवी आरोग्याचा विचार करताना अनेकदा दात आणि तोंडाच्या आरोग्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. मात्र, मौखिक आरोग्य हे सर्वांगीण आरोग्याचा महत्त्वपूर्ण भाग आहे. दातांचे आजार, हिरड्यांचे विकार, तोंडाच्या स्वच्छतेकडे होणारे दुर्लक्ष आणि वेळेवर उपचार न घेण्यामुळे उद्भवणाऱ्या समस्या याबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. याच अनुषंगाने डॉ. पतकराव परिषदेत प्रतिबंधात्मक उपाययोजना, नियमित दंततपासणी, आरोग्य शिक्षण आणि जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित करणार आहेत.

आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. पतकराव मौखिक आरोग्याचे महत्त्व, दंतविकारांना प्रतिबंध करण्याचे उपाय, जनजागृतीची आवश्यकता आणि भारतातील आरोग्यविषयक उपक्रम यांसारख्या मुद्द्यांवर आपले विचार मांडणार आहेत. मौखिक आरोग्याबाबत व्यापक जनजागृती निर्माण करून निरोगी समाजाच्या उभारणीसाठी जागतिक स्तरावर एकत्रित प्रयत्न होण्याची आवश्यकता असल्याचा संदेशही ते या माध्यमातून देणार आहेत.

‘निरोगी भारत, निरोगी विश्व’ हा संदेश जगापर्यंत

या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आल्याबद्दल आपली भावना व्यक्त करताना डॉ. आदित्य पतकराव म्हणाले, “शाश्वत भविष्यासाठी निरोगी माणसे आवश्यक आहेत. आजारांना सीमा नसतात. त्यामुळे मौखिक आरोग्याबाबत जागरूकता आणि प्रतिबंध ही सर्व देशांची सामायिक जबाबदारी आहे. भारताचा हा संदेश जगापर्यंत पोहोचवण्याची संधी मिळणे हा माझ्यासाठी सन्मान आहे.”

त्यांच्या या भूमिकेतून मौखिक आरोग्याबाबत जनजागृती करण्याची आणि आरोग्याच्या क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित होते.

अंबाजोगाईच्या शिरपेचात मानाचा तुरा

अंबाजोगाईसारख्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक परंपरा लाभलेल्या शहरातून पुढे येत पुण्यात वैद्यकीय क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या डॉ. आदित्य पतकराव यांना आता आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आपले विचार मांडण्याची संधी मिळत आहे. नवी सांगवी येथून सुरू झालेला त्यांचा वैद्यकीय प्रवास जागतिक स्तरापर्यंत पोहोचत असल्याने ही बाब स्थानिक वैद्यकीय क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरत आहे.

डॉ. पतकराव यांचे हे आंतरराष्ट्रीय निमंत्रण केवळ त्यांच्या वैयक्तिक कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा नसून, अंबाजोगाईच्या भूमिपुत्राच्या कर्तृत्वाची जागतिक स्तरावर दखल घेतली जात असल्याचेही प्रतीक आहे. त्यांच्या माध्यमातून भारतातील मौखिक आरोग्यविषयक दृष्टिकोन जागतिक व्यासपीठावर मांडला जाणार असून, या सहभागाकडे वैद्यकीय क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

अंबाजोगाईचा भूमिपुत्र जागतिक व्यासपीठावर भारताच्या आरोग्यदृष्टीचा आवाज बनणार असल्याने परिसरातून डॉ. आदित्य पतकराव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### भारताच्या आरोग्यविषयक उपक्रमांची मांडणी

भारतामध्ये आरोग्यविषयक जनजागृती, प्रतिबंधात्मक उपचार आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नांमध्ये मौखिक आरोग्याला अधिक महत्त्व देण्याची गरज असून, लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येकाने दातांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.




### जागतिक व्यासपीठावर मौखिक आरोग्याचा जागर

इंटरनॅशनल फोरम ऑर्गनायझेशनच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या आंतरराष्ट्रीय परिषदेत विविध देशांतील सरकारी प्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ, आंतरराष्ट्रीय संस्थांचे प्रतिनिधी, नागरी समाजातील मान्यवर तसेच खासगी क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. जागतिक स्तरावरील विविध विषयांवर विचारमंथन होणाऱ्या या परिषदेत डॉ. पतकराव यांना मौखिक आरोग्याच्या महत्त्वावर आपले विचार मांडण्याची संधी मिळणार आहे.